**मांडन शिल्प ( इंस्टोलेशन )**

शाही दसरा  कोल्हापूरचा २०२३

दिनाक २२ ऑक्टोबर ते २४ ऑक्टोबर, २०२३

सकाळी १०.०० ते सायं. ८.००

कोल्हापूरचा दसरा हा राज्याचा उपक्रम म्हणून शासनाने घोषित केला असून भाविक ,स्थानिक नागरिक व पर्यटकांच्या दृष्टीने अधिक व्यापक व्हावा यासाठी दसऱ्याच्या दिवशी जुना राजवाडा ते नवा राजवाडा या मार्गावरील परिसर लक्षवेधी व सुशोभित करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे . त्याचा एक भाग म्हणून खानविलकर पेट्रोल पंप ते महावीर कॉलेज गेट दरम्यान मांडन शिल्प ( इंस्टोलेशन ) स्पर्धा आयोजित केली आहे.

**स्पर्धेचे नियम व अटी :**

१. मांडणीचा विषय : देश विदेशातले लोकोत्सव

२. मांडण शिल्प स्थापित करण्यासाठी सर्वसाधारणपणे १२ फूट रुंदी, १५ फूट लांबी आणि १२ फूट उंचीचा वापर करणे अपेक्षित आहे.

३. स्पर्धा महाविद्यालयीन विद्यार्थी व सर्वा साठी खुली असेल.

४. एका संघामध्ये जास्तीत जास्त सहा कलाकार सहभागी होवू शकतात .  त्यांची नाव, पत्ता , मोबाईल नंबर सह माहिती संयोजकांकडे नोंद करावयाची आहे. सहभागासाठी संयोजकांकडे दिनाक १४ ऑक्टोंबर २०२३ पूर्वी अर्ज करणाऱ्या सुरवातीच्या फक्त १५ संघाना प्राधान्य असेल.

५. आपण बनविणाऱ्या कलाकृतीचा फोटो काम सुरु करण्यापूर्वी निवड समितीकडून आपल्या सोईप्रमाणे मंजूर करून घ्यावा.

६. जास्तीत जास्त नैसर्गिक बाबी, वस्तू  वापर करून रचना करावी.  पुनर्वापर करता येणारे साहित्य जसेकी रद्दी पेपर, पुठ्ठा, करोगेटेड बॉक्स,  वापरून झालेले साहित्य, स्क्रॅपआणि सहज उपलब्ध पर्यावरण पूर्वक साहित्यात मधून तयार होणारे इन्स्टॉलेशन अपेक्षित आहे.

७. सदरच्या मांडणीसाठी येणारा खर्च, वाहतूक व अन्य आवश्यक खर्च प्रत्येक संघाने स्वतः करावयाचा आहे.

८. बक्षीस म्हणून प्रथम क्रमांक रुपये एक लाख , द्वितीय क्रमांक रुपये पंच्याहत्तर हजार , तृतीय रुपये पन्नास हजार असे असेल. स्पर्धक ५ हून कमी आल्यास फक्त एकच

९. परीक्षकांनी मान्य केलेल्या संघास रुपये दहा हजार रुपये पर्यंत साधनसामुग्री साठी सहभाग मूल्य देण्यात येईल.

१०. दिनांक २२ ते २४ ऑक्टोबर, २०२३ दरम्यान वाहतुकीस व अन्य नागरिकास अडथळा होणार नाही याची काळजी घेवून स्पर्धकांना शिल्प मांडणी करता येईल. त्यासाठी ची जागा नाव नोंदणी नंतर विषयास उचित ठरेल त्यानुसार संयोजकांचे कडून सुचवली जाईल. त्याच ठिकाणी शिल्प उभे करावे लागेल.

११. सहभागासाठी संयोजकांकडे दिनाक १६ ऑक्टोंबर २०२३ पूर्वी अर्ज करणाऱ्या सुरवातीच्या फक्त १५ संघाना प्राधान्य असेल. त्यानंतर सहभागी होणाऱ्या टीमला पूर्ण पणे स्वतःच्या खर्चाने इन्स्टॉलेशन करावे लागतील, (सहभाग मूल्य म्हणून मिळणारे दहा हजार रुपये त्यांना मिळू शकणार नाहीत).

१२. सहभाग नोंदणी https://kolhapur.gov.in या संकेतस्थळावर करण्यात यावी.

१३. इन्स्टॉलेशनची पूर्वतयारी अन्यत्र ठिकाणी केली असल्यास ती तुम्ही स्पर्धे पूर्वी उपलब्ध करून दिलेल्या जागी आणून जोडू शकतील.

१४. सदर इन्स्टॉलेशन शिल्प हे सर्व पर्यटकांना दिनांक २२ ते २४ ऑक्टोबर, २०२३ या दरम्यान पहाण्यासाठी खुले असणार आहेत.

१५. दिनांक २२ ऑक्टोंबर, २०२३ रोजी सकाळी दहा पासून परीक्षण केले जाणार असल्याने त्यापूर्वी सादरीकरणाचे काम पूर्ण झालेले असावे.

देश विदेशातले लोकोत्सव या विषयीच्या या मांडण शिल्पा मधील कामकाजातील साफसफाई, अवकाश योजना, मांडण्यात आलेला सांस्कृतीक आशय, या सर्वाचा विचार करून गुणांकन केले जाईल. दिनांक २४ ऑक्टोबर २०२३ रोजी संयोजकांमार्फत निकाल स्पर्धेची संपूर्ण प्रकिया पूर्ण झाले नंतर जाहीर केला जाईल, निवड समितीचा निर्णय अंतिम राहील. निवड समितीची निवड मा. जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर येथील दसरा महोत्सव ट्रस्ट मार्फत करण्यात येईल.

नोंदणी साठी संपर्क :

**प्राचार्य अजेय दळवी**

दळवीज आर्ट इन्स्टिट्युट, लक्ष्मीपुरी कोल्हापूर.

मोबाईल ९४२३०४२५४९

ई मेल ajeydalvi2@gmail.com